LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ६८ वा फोन २३०१०१ दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ गुरुवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# दुर्दैव ;ज्या मर्सिडीजमधून अजितदादा बीड शहरात फिरायचे त्याच गाडीत दादांचा अस्थिकलश आणला

बीड दि.४ (प्रतिनिधी):- राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर देशभरात ठिकठिकाणी त्यांच्या अस्थींचे विसर्जन केले जात आहे. यापैकी एक अस्थिकलश बीडमध्ये आणण्यात आला होता. या कलशातील अस्थींचे बुधवारी गोदावरी नदीत विसर्जन करण्यात आले. अजित पवार ज्यावेळी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर यायचे, तेव्हा ते ज्या मर्सिडीज कारमधून प्रवास करायचे आज त्याच कारमधून त्यांचा अस्थिकलश गोदावरी नदीच्या दिशेने नेण्यात आला. सकाळी १० वाजता राष्ट्रवादी मध्यवर्ती कार्यालयात कार्यकर्त्यांसाठी आणि नागरिकांसाठी आस्थ दर्शन उपलब्ध करण्यात आले होते. यावेळी आमदार धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके यांच्यासह माजी आमदारांनी अजित पवारांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. अजित पवार बीड दौऱ्यात ज्या गाडीतून फिरायचे त्याच गाडीतून गोदावरी नदीकाठी असलेल्या शनी मंदिर येथे कलश नेऊन अजितदादांच्या अस्थी विसर्जित करण्यात आल्या. धनंजय मुंडे अस्थिकलशाच्या दर्शनासाठी सभागृहात दाखल होताच एआयच्या माध्यमातून निर्मित केलेला एक ऑडिओ लावण्यात आला. अजित पवार यांना शेवटचा निरोप देताना सर्वच जण भावूक झाले होते.

बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचा अस्थीकलशन दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी शोकाकुल वातावरणात अस्थीकलशाचे दर्शन घेताना लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बीडकरांचे डोळे पाणावले. यावेळी अतिशय जड अंतःकरणाने उपस्थितांनी अस्थीकलशाचे दर्शन घेताना माना झुकवल्या. दुपारी २ वाजेपर्यंत राष्ट्रवादी कार्यालयात अस्थिकलश पान २ वर



## बीड शहरात उभारणार दादांचा पुर्णाकृती पुतळा

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकस्मिक दुःखन निधन झाले. स्व.अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आजही स्व.अजितदादा पवार हे आपल्यात नाहीत हे मन मानायला तयार नाही. स्पष्टोक्तेपणा, धाडसी निर्णय आणि कामावरचा विश्वास ही दादांची खरी ओळख होती. संकाटातही न डगमगता राज्याच्या विकासासाठी झटणारा नेता म्हणून अजितदादा कायम स्मरणात राहतील. स्व.दादांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील जनतेने नगर पालिका निवडणुकीत भरभरून आशिर्वाद दिले. बारामतीसारखा बीड शहराचा विकास करण्याचा संकल्प आदरणीय दादांनी केला होता, असे दादा बीडकरांच्या कायम स्मरणात राहावेत यासाठी शहरात स्व.अजितदादा पवार यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याचा संकल्प आम्ही केला असेही ते यावेळी म्हणाले.

## माजलगाव केसापुरी कॅम्पला राष्ट्रीय महामार्गावर धोकादायक मच्छी मार्केट

## भरधाव ट्रॅक्टर घुसल्याने मोठी दुर्घटना टळली



माजलगाव दि.४ (प्रतिनिधी) :- माजलगाव शहरातील केसापुरी कॅम्प परिसरात राष्ट्रीय महामार्गालगत रस्त्यावर बसणाऱ्या मच्छी विक्रेत्यांमुळे वाहतुकीस मोठा धोका निर्माण झाला आहे. याच ठिकाणी रस्त्यालगत अनधिकृतरीत्या सुरू असलेल्या मच्छी मार्केटमध्ये भरधाव वेगाने येणारा ट्रॅक्टर घुसल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवीतहानी झाली नाही; मात्र काही वेळासाठी परिसरात एकच गोंधळ उडाला.

राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असताना, रस्त्याच्या कडेला तसेच काही ठिकाणी थेट रस्त्यावरच मच्छी विक्री केली जात असल्याने अपघाताचा धोका कायम आहे. या भागातून अवजड वाहने, ट्रक, ट्रॅक्टर, बस तसेच दुचाकी मोठ्या संख्येने जात असतात. अचानकपणे रस्त्यावर गर्दी झाल्याने पान २ वर

## खा.बजरंग सोनवणेंनी रेल्वेचा प्रश्न चांगलाच मनावर घेतला

# धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर रेल्वे मार्गाच्या प्रत्यक्ष कामासाठी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांची घेतली भेट

नवी दिल्ली दि.४ (प्रतिनिधी):- बीड लोकसभा मतदारसंघासह संपूर्ण मराठवाडा विभागातील रखडलेले व अत्यावश्यक रेल्वे प्रकल्प पुर्ण करून घेण्यावर खा.बजरंग सोनवणे यांनी फोकस केला आहे. रखडलेल्या रल्वेमार्गाचे काम मार्गी लावण्यासाठी संसद भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे, संचार व इलेक्ट्रॉनिक्स मंत्री आश्वनी वैष्णव यांची भेट घेऊन खा.बजरंग सोनवणे यांनी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मराठवाड्याच्या दळणवळण विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय मांडण्यात आले.

### बीडहून मुंबई, पुण्यासाठी इंटरसिटी रेल्वे सुरु करण्याची केली मागणी

विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी तसेच नोकरदार वर्गाची वाढती गरज लक्षात घेता बीड-अहिल्यानगर-मुंबई व बीड-अहिल्यानगर-पुणे या मार्गांवर दररोज धावणाऱ्या इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या सेवांमुळे मराठवाड्याचा संपर्क थेट राज्याच्या प्रमुख शहरांशी मजबूत होणार असल्याचे सांगण्यात आले. या विषयावर सखोल चर्चा झाली.

### बार्शी नाका येथील नव्या रेल्वे स्टेशनसाठी आग्रही

पूर्व बीड शहर तसेच ग्रामीण भागातील नागरिकांसाठी बार्शी नाका (बीड) परिसरात सुलभ ठिकाणी नवीन रेल्वे स्टेशन उभारण्याची गरज आहे, शिवाय नागरिकांची तशी मागणी देखील असल्याचे खा.सोनवणे यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले. या रेल्वे स्थानकामुळे प्रवास अधिक सोयीस्कर होऊन बीड शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



यावेळी मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाचा मुद्दा बैठकीत अग्रक्रमाने मांडण्यात आला. मार्च २०२५ मध्ये या प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल रेल्वेमंत्र्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. या प्रकल्पाचा डीपीआर तातडीने पूर्ण करून प्रशासकीय मान्यता देत प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, पान २ वर

## २०२९ ला बीडचा आमदार अनिल जगतापच असायला हवा - ना.संजय शिरसाट

### चंपावती महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न

बीड दि.४ (प्रतिनिधी):- बीडच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा देणारा चंपावती महोत्सव सध्या संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेत असून बीडची सकारात्मक ओळख निर्माण करण्यात महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजयजी शिरसाट यांनी केले. चंपावती महोत्सवाच्या भव्य उद्घाटनप्रसंगी बोलताना ना. शिरसाट म्हणाले की, अनिलदादा जगताप यांनी राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून समाजकारण, क्रीडा आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करत सर्व सामान्य जनतेचे आजवर भले केले आहे. बीडच्या प्रतिमेत बदल घडवून आणण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे २०२९ मध्ये बीडचा आमदार अनिल जगतापच असायला हवा, असे आवाहन त्यांनी उपस्थित बीडकरांना केले.



अनिलदादा जगताप फाउंडेशन व बीड शिवसेना आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक २०२६ या स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा दि. ४ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. या वेळी शिवसेनेच्या उपनेत्या संगीता ठोंबरे, दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमत भंडारी, दै. दिव्य लोकप्रभाचे संतोष मानूरकर, दै. प्रारंभचे संपादक जालिंदर धांडे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, पान २ वर

### जरांगे पाटील यांच्या संदर्भात दोन पिदाड्यांची ऑडिओ क्लिप व्हायरल

बीड दि.४ (प्रतिनिधी):- मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या संदर्भात दोन पिदाड्यांची ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. दारु पिल्यानंतर एकाने जरांगे समर्थकास फोन करत मनोज जरांगे यांना गोळ्या घालून मारतो अशी धमकी दिल्याची ऑडिओ क्लिप आहे. दोघांचेही संभाषण अतिशय शिवराळ असून दोघेही पिदाडे असल्याचे ऑडिओ क्लिपवरुन स्पष्ट होत आहे. दोन पिदाडे पाहिजे तेवढी दारु पितात आणि वाटेल ते बोलून सामाजिक वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न करतात पान २ वर

## मनोज जरांगेंची नार्को टेस्ट करा, एसआयटी चौकशी करा

### अमोल खुणे यांची मागणी

जालना दि.४ (प्रतिनिधी):- मनोज जरांगे पाटील यांची नार्को टेस्टसह एसआयटी चौकशी करावी अशी मागणी, जरांगेंच्या घातपाताचा आरोप असलेल्या अमोल खुणे यांनी केली आहे. ते मनोज जरांगे यांचे जुने सहकारी देखील होते. या मागणीचे निवेदन त्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले असून अमोल खुणे यांनी मनोज जरांगे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. माझा आणि धनंजय मुंडे यांचा कोणतीही सबंध नसून, दादा गरुडच्या सोबतच्या संभाषणात सुपारीचा कोणताही उल्लेख नाही, उलट दादा गरुडकडे मनोज जरांगे यांचे पुरावे असल्याचं त्यांनी म्हंटलंय. कोपर्डी प्रकरणातील आरोपींना मारहाण करण्यासाठी आपल्याला मनोज जरांगे यांनीच सांगितलं होतं, यात जरांगे मात्र स्वतः पळून गेले होते असेही खुणे यांनी म्हटलंय. जरांगे यांचा कोणी आका असेल म्हणून ते धनंजय मुंडे यांच्यावरती टीका करत असतील. मनोज जरांगे आणि मी २०१६ मध्ये धनंजय मुंडे यांच्याकडे कार्यक्रमासाठी पैशाची मागणी केल्याचां खुलासा देखील अमोल खुणे यांनी केला आहे. मी कोर्टातून सुटू नये म्हणून मनोज जरांगे यांनी वकील पान २ वर



## धानोरा रोडचे काम एकाने अडविले मात्र सामाजिक कार्यकर्त्यांच्या मध्यस्थीने पुन्हा सुरु



बीड दि.४ (प्रतिनिधी):- शहरातील धानोरा रोडच्या कामाला दीर्घ प्रतिक्षेनंतर सुरुवात झाली आहे. गेल्या कित्येक वर्षापासून या रस्त्यावरील खड्ड्यांचा आणि खराब रोडचा त्रास नागरिकांना प्रचंड प्रमाणात सहन करावा लागला. आता कुठे या कामाला सुरुवात झाली आहे. त्यातच एका व्यक्तिने हे काम अडविले होते. भूसंपादन झाले तरी अजुन पैसे मिळाले नाहीत यासह इतर पान २ वर

### अभिवादन न केल्याने भीमसैनिक नाराज

## पंकजा मुंडेंना डॉ.बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार घालू दिला नाही

बीड दि.४ (प्रतिनिधी):- लातूर जिल्ह्यातील जानवळ (ता.चाकूर) या ठिकाणी प्रचार सभेसाठी आलेल्या भाजप नेत्या मंत्री पंकजा मुंडे यांनी मैदाना जवळच असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले नाही, सभा संपल्यानंतर हा प्रकार त्यांच्या लक्षात येताच त्यांनी डॉ.बाबासाहेब यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र आधीच नाराज असलेल्या भीमसैनिकांनी पंकजा मुंडेंना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालू दिला नाही. जानवळ येथील मैदानात पंकजा मुंडे पान २ वर

### दररोज वेगवेगळ्या कारणावरुन आंदोलन

सध्या ठिकठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात दररोज एका वेगळ्या कारणावरुन सर्व जण आंदोलन करु लागले आहेत. राज्यात अनेक ठिकाणी आंदोलने होत असल्याचे समोर येऊ लागले आहे. सर्वसामान्य नागरिकांसह काही ठिकाणी कार्यकर्ते देखील अशी आंदोलने करु लागले आहेत.




उठावना



अमर एवम् आशीष बाहेती इनके पिताजी, आनंद बाहेती इनके काकाजी
**श्री.विजयजी सीतारामजी बाहेती**
(हरकी लिमगाव वाला) इनका स्वर्गवास मंगलवार, तारीख ३ फरवरी को हुवा। जिनका उठावना कल गुरुवार ता.५ फरवरी को दोपहर ४ बजे निजी निवास, निर्मिती इस्टेट, दत्त मंदिर के पास, सुभाष रोड़, बीड़ यहां पर होगा।
: शोकाकुल :
बाहेती परिवार, बीड.

# पार्श्वभूमी

दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ पान - ३


## चित्रकला स्पर्धेत आदर्श विद्यालयाच्या ६१९ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

बीड दि ४ (प्रतिनिधी)- अनिल दादा जगताप फाउंडेशन बीड व शिवसेना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चंपावती महोत्सव २०२६ अंतर्गत चित्रकला स्पर्धेत आदर्श प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे एकूण ६१९ विद्यार्थी सहभागी झाले होते या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते तिसरी या गटांमध्ये ७८ मुलांनी छोटा भीम हे कार्टून काढले चौथी ते सहावी या गटांमध्ये २०४ विद्यार्थ्यांनी घोडा हे चित्र अतिशय सुंदर रेखाटले तर सातवी ते दहावी या गटात विद्यार्थ्यांनी शिवसेनाप्रमुख हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत सुंदर चित्र रेखाटले विद्यार्थ्यांची चित्रातील रंगसंगती पाहून बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा जिवंतपणा भासत होता. सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## सौ.के.एस.के महाविद्यालय मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न

बीड दि ४ (प्रतिनिधी)- येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाच्या वतीने प्रा. संजय काळे यांचे रोल ऑफ सायबर सेक्युरेटी इन डेली लाईफ याविषयावर विशेष व्याख्यान दि. २७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याच्या काळात सायबर सेक्युरेटी ही अत्यंत आवश्यक असून त्यावर उपाय योजना कराव्यात. याबद्दल त्यांनी महाकवच ॲपची सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे म्हणाल्या की, संगणक विभागा मार्फत प्रत्येकवर्षी विविध विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते असते. यावेळी त्यांनी रोल ऑफ सायबर सेक्युरेटी इन डेली लाईफ हा महत्वाचा विषय असून सायबर गुन्हेगारी विषयी जागृता आणि सुरक्षीत डिजीटल सवयी याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगणक विभागप्रमुख श्रीमती प्रा. सोनाली गवारे यांनी केले तर आभार प्रा. ऐश्वर्या रुईकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थी राहुल बनगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले. सदरील कार्यक्रमात विद्यार्थी प्राध्यापक व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेसाठी इशारा दिला तसे यंत्रणा सक्षमपणे काम करेल काय ?

बीड, दि. ४ (प्रतिनिधी) - बीड जिल्ह्यामध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त राबवाव्यात असे आवाहन करण्याबरोबरच परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यासह सदर केंद्र व परिसरामध्ये गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर अदखलपात्र गुन्हे दाखल करण्यात येतील. असा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला खरे, परंतु दरवर्षीचे परीक्षा वेळेचे चित्र पाहता इमारतीवर चढूनच लोक कॉफी देतात, यावेळी तैनात केलेले पोलीस दखल घेत नाहीत किंवा आत मध्ये देखील कॉफीचा सुळसुळाट असल्याचे अनेकदा निदर्शनास आले आहे .त्या संदर्भात कठोर कारवाया झाल्या नाहीत. तेव्हा यावर्षी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे कॉपीमुक्त परीक्षा होतील काय? असा प्रश्न सूज्ञ नागरिकांना देखील पडला आहे.

दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीव्दारे तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत उउढत कैमेरे बसवून ते कार्यान्वयीत करावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावर आवाजाचे रेकॉडींग होणारे उउढत कैमेरे बसवावेत, त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करावी व त्याचा अहवाल सादर करावा, तसेच उउढत कैमे-यांचे ॲक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून तेथे घेण्यात यावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील आणि ज्या परीक्षा केंद्रातील वर्ग खोलीमध्ये उउढत कॅमेरे नसतील, तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी यांची अदलाबदल करावी. असं सांगून बीड जिल्ह्यामध्ये इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत कॉपी मुक्त अभियान राबवावे असे आवाहन केले.

पुढे नमूद केले की परीक्षाकेंद्रावर नियुक्त कर्मचा-या व्यतीरिक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तीना प्रवेश देऊ नये, इतर कर्मचारी परीक्षा केंद्रावर आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर अनुदानित, अंशतः अनुदानित व जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर कर्मचारी नेमावेत, परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, तालुकास्तरावरुन महत्वाच्या पेपरला वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात.बीड जिल्हयामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून जिल्हा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने संबधित यंत्रणेने प्रयत्न करावेत, तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्तीत जास्त लक्ष ठेवून परिक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबधित अधिकारी. कर्मचा-यानी लक्ष द्यावे असेही

### परीक्षा केंद्र व परिसरात गैरप्रकार करणारावर दखलपात्र गुन्हे नोंद करणार

परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे, तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परीसरात प्रतिबंधात्मक उपायोजना लागू करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना प्रोत्साहीत करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

जिल्हा दक्षता समितीने इ.१० व १२ वी च्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व विद्यार्थ्यामध्ये गुणवत्ता वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हाभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबतच्या उपाययोजना केलेल्या असून मुलांच्या शिक्षणाचा पाया मजबूत होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान महत्वाची भूमिका असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

जॉन्सन या प्रसंगी म्हणाले. बीड जिल्हयामध्ये मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च-२०२६ आयोजित केल्या आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि.१० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. दरम्यान या परीक्षा सुरळीत पार पडल्या जाव्या त्या कॉपीमुक्त व्हाव्यात असे अनेकांना वाटते परंतु ज्याचे पाल्य परीक्षेला बसलेले आहेत त्या पाल्यांना कॉप्या पुरवण्यासाठी या पाल्याच्या नातेवाईकांचा परीक्षा केंद्राला गराडा दिसून येत असतो यासंदर्भात मात्र कसल्याही प्रकारे पोलीस अथवा संबंधित यंत्रणा दखल घेत नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे यंत्रणा प्रामाणिकपणे काम करून या परीक्षा कॉपीमुक्त होण्यास प्राधान्य देतील काय असा संवाद देखील पडू लागला आहे..

## पाली परिसरात रानडुकरामुळे ज्वारी पिकांची अतोनात नुकसान

पाली,दि.४(प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील पाली परिसरात रानडुकराची प्रचंड उत्पत्ती वाढल्यामुळे हे रानडुकरे शेतकऱ्यांच्या पिकाची प्रचंड नासाडी करीत असून पेरणी केलेले पिके उध्वस्त करत आहेत. त्यामुळे वन विभागाने या रानडुकराचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.वन विभाग मात्र नावालाच आहे वन विभागाचे कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत आहेत.वन विभाग फक्त कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. जरी कोणी शेतकऱ्यांनी तक्रार दिल्या तरी त्याच्या तक्रारी रिजेक्ट करतात. सध्या पाली परिसरात ज्वारी व इतर पिकांची प्रचंड रानडुकरामुळे नुकसान होत. शेतकऱ्यांनी पिकासाठी केलेला खर्च हे देखील निघत नाही. शासनाने सरसकट शेतकऱ्यांसाठी तारकुंपण द्यावे जेणेकरून शेतकऱ्यांची उभे पिके राहतील आणि कुठेतरी अन्न धान्याचे नासाडी होणार नाही. सध्या एक मात्र उपाय तर कुंपणच आहे.

वन विभाग मात्र कागदपत्रे च कार्य करीत आहे कुठेच त्यांच्या कर्मचाऱ्यांची काम दिसून येत नाही.सध्या पाली परिसरात रानडुकरामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे तात्काळ वन विभागाने या डुकरांचा बंदोबस्त करावा व शेतकऱ्यांचे झालेले नुकसानीचा पंचनामा करून तात्काळ शासनाने त्या शेतकऱ्यांना नुसकान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे जर वनविभागाने याची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## विनायक माध्य.व उच्च माध्य.विद्यालयात शेख सरांचा सेवापूर्ती गौरवासह १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना समारंभ पूर्वक निरोप

बीड दि ४ (प्रतिनिधी)- विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पेठ बीड येथे शेख अलीम शेख हुसेन यांचा सेवा पूर्ती समारंभ व दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य बेग रियाज सर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शरद सदाफुले प्रसिद्ध कथाकार, प्रकाशजी राठोड सर कार्यालयीन अधीक्षक, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका कीर्तीताई पांगारकर , श्रीमती भारतीताई क्षीरसागर , पत्रकार शाह इम्रान गफ्फार , कालू बेग , शेख जमील भाई ,शाळेचे उपमुख्याध्यापक माणिक अनुसे सर ,शाळेचे पर्यवेक्षक सुहास आमरापूरकर सर, कॉलेजचे पर्यवेक्षक गाडेकर सर, एम,सी,व्ही,सी चे पर्यवेक्षक सिद्धेश्वर सर हे होते. यावेळी सेवानिवृत्ती बद्दल शेख आलीम शेख हुसेन यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे प्रास्ताविक गाडेकर सर यांनी केले. शाळेतील विद्यार्थिनी निकिता जगताप ,जाधव शिवानी , क्षीरसागर शौर्य , शेख अक्सा, सोनटक्के अंबिका यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे उप मुख्याध्यापक माणिक अनुसे सर , मुख्याध्यापिका कीर्तीताई पांगारकर प्रकाश राठोड सर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक तथा प्राचार्य बेग रियाज सर यांनी विद्यार्थ्यांना दहावी व बारावीनंतर पुढे काय करायला पाहिजे तसेच आलेल्या संधीचे सोने केले पाहिजे याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक सरमल सर यांनी केले. व आभार कॉलेजचे प्राध्यापक कागदे सर यांनी मानले.

# बीड जिल्ह्यात वर्षभरात २५६ शेतकऱ्यांची आत्महत्या तर फक्त १६८ वारसांना मदत-डॉ.ढवळे

बीड दि ४ (प्रतिनिधी)-बीड जिल्ह्यात गेल्या एक वर्षाच्या कालावधीत म्हणजे १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान तब्बल २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक



आणि विदारक माहिती समोर आली आहे. जिल्हा प्रशासनाकडे या सर्व आत्महत्यांची अधिकृत नोंद असून ही आकडेवारी मराठवाड्यातील शेतकऱ्यांची भयावह अवस्था अधोरेखित करणारी ठरत असल्याचे गाव गणेश ढवळे यांनी नमूद केले.

शेतीतील सततची नापिकी, वाढते उत्पादन खर्च, खाजगी सावकार व बँकांचे कर्ज, बाजारभावातील अस्थिरता, तसेच अवकाळी व अतिवृष्टीमुळे झालेले प्रचंड नुकसान यामुळे बळीराजा आर्थिक कोंडीत सापडत असून अनेकांना आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घ्यावा लागत असल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.जिल्हा प्रशासनाने आत्महत्येची प्रकरणे जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत तपासून १९३ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरवली आहेत. यापैकी १६८ मयत शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १ लाख रुपयांची शासकीय मदत वितरित करण्यात आली आहे.

तर ३४ प्रकरणे अपात्र ठरवण्यात आली असून २९ प्रकरणे चौकशीअंती प्रलंबित असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली आहे. दरम्यान आकडेवारीनुसार नोव्हेंबर २०२५ हा सर्वाधिक धक्कादायक महिना ठरला असून या एका महिन्यात ३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे प्रमाण शासनाच्या शेतकरी कल्याण योजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी शासनाच्या शेतकरी कल्याणाच्या उपाययोजनांवर तीव्र टीका करताना म्हटले की,''शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जातात, मात्र त्या केवळ कागदोपत्रीच असून प्रत्यक्षात त्या प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे आत्महत्यांचे सत्र थांबत नसल्याची खंत आहे. सरकारने केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता कर्जमाफी, हमीभाव, पीकविमा, सिंचन सुविधा आणि मानसिक आधार यावर भर देणे गरजेचे आहे.

## आयुष थिगळे तबला विशारद पुर्ण परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

बीड दि ४ (प्रतिनिधी)- येथील नादब्रह्म संगीत विद्यालयाचा विद्यार्थी आयुष रविंद्र थिगळे अ.भा.गां.मंडळ, मुंबई या संस्थेद्वारे घेण्यात आलेल्या डिसेंबर -२०२५ सत्रातील तबला विषयाच्या विशारद पुर्ण परीक्षेत ५२० गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे.बालपणापासुनच आयुषला तबला वादनाची आवड होती.त्याचे विशारद पुर्ण पर्यंतचे तबला वादनाचे शिक्षण नादब्रह्म संगीत विद्यालयात गुरुवर्य प्रा.महेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.तबला वादनासोबतच आयुष थिगळे सध्या पुणे येथे नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत आहे.उच्च शिक्षण आणि कला या दोन्हींचा त्याने उत्तम समन्वय साधला आहे.त्याच्या या यशाबद्दल सांगितिक क्षेत्रातील मान्यवर , संगीत साधक तसेच परिवारातील सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## गायरान जमिनीवरील मुरूम उत्खननाबाबत मुख्यमंत्र्याकडे करणार तक्रार डॉ.लक्ष्मण जाधव

बीड दि ४(प्रतिनिधी)- बीड पिंगळे ग्रा.बहीरवाडी इमामपूर रोड येथे भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या उत्थानासाठी राज्य शासनाच्या वतीने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना अंतर्गत घरकुलासाठी पाच एकर जमीन हस्तांतरित प्रक्रिया चालू असताना अवैध गौण खनिज उत्खननासाठी रस्ता करून मुरुम चोरी सुरू केली आहे. या संदर्भात भाजपाचे गाव लक्ष्मण जाधव यांनी घटनास्थळी पाहणी करून खंत व्यक्त करण्याबरोबर यासंदर्भात भाजपाच्या वरिष्ठ नेत्याकडे व मंत्र आणि तक्रार करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. याबाबत माहिती अशी की जोरात बोललेली वरील मुरूम व त्या प्रमाणात उचलला जात आहे सर्वत्र खड्डे पडले आहेत. सदर गायरानातील पासपोर्ट दिल्ली भटक्या विमुक्त जाती जमातीच्या उत्थानासाठी कारवाई चालू असताना हा प्रकार घडत आहे या संदर्भात गाव लक्ष्मण जाधव यांनी सदर ठिकाणाची पाहणी करून याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे व संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात येणार असून याबाबत कठोर कारवाई करावी व ही योजना कार्यान्वित करण्यासाठी तातडीने सकारात्मक पाऊलं उचलून या भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या भटकंती करणाऱ्यांना सामाजिक न्याय व हक्क प्रदान करण्यात यावीत अशी मागणी करणार असल्याचे मुख्य जाती जमातीचे प्रदेशाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे .



माजलगाव - सोनपेठचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांचा शिंदे निवासस्थानी सत्कार करताना सिद्धेश्वर बँकेचे संचालक रामराव शिंदे , प्रकाश शिंदे ,ॲड .इंद्रजीत शिंदे, रामेश्वर कदम, पत्रकार गणेश पाटील, ॲड रणजीत शिंदे विश्वजीत शिंदे कैलास नायबळ राहुल शिंदे रोहित शिंदे आदी.

## प्रेम पवारची इस्त्रो शै.दौऱ्यासाठी निवड झाल्याने पालक वर्ग मधून होतोय कौतुक

बीड दि ४(प्रतिनिधी)- इतर मागास बहूजन कल्याण विभाग



महाराष्ट्रराज्याच्या अधिनस्त असलेल्या आश्रमशाळेच्या विदयार्थीची इस्त्रो शैक्षणिक अभ्यासक्रम दौऱ्यासाठी एक चाचणी परिक्षा घेण्यात आली होती. यात गेवराई तालुक्यातीलतिरूपती माध्यमिक व ऊच्च माध्यमीक आश्रमशाळा पाचेगाव चा ११ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेला विदयार्थी पवार प्रेम भिमरावची शैक्षणिक अभ्यासक्रम दौऱ्या इस्त्रो साठी निवड झालेली आहे. या लेडी बद्दल पालक वर्ग कौतुक होऊ लागला आहे.एका तांड्यावरील ऊसतोड मजूराचा मूलाची निवड झाल्याचे पालक वर्ग आनंद व्यक्त होत असून इतर मागास बहूजन कल्याण बीडचे सहाय्यक संचालक क्षिरसागर डि.बी,सहाय्यक संचालक वडवलेसाहेब,आश्रमशाळा विभागाचे बारगजे लक्ष्मण,संस्थेचे अध्यक्ष माजी जि.प.सदस्य शामराव गूरूजी राठोड,सचिव गोरक्षनाथ राठोड,प्राचार्य राजेंद्र दाभाडे,मूख्याध्यापक राजेश खरसाडे, प्रा,ननवरे,प्रा,राठोड, प्रा.धूंगरड, प्रा.कानाडे, प्रा.काचगूंडे,प्रा.मेंढके,प्रा.जाधव मॅडम,प्रा.दाभाडेयांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी अभ्यास दौऱ्यासाठी शूभेच्छा दिल्या पण ग्रामस्थांना जशी माहिती कळली तसे पालक वर्ग मधून मोठेत्याचे कौतुक होऊ लागले आहे.



बीड - डॉ. राजा मचाले सर यांना जन्मदिना निमित्त शुभेच्छा देताना ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.एल.एम.काकडे, प्रा.बप्पासाहेब फाळके,ॲड.विष्णुपंत काळे आदी.

# आज पुन्हा ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकून दोन जण जखमी

जामखेड दि ४(प्रतिनिधी)- शहरातील अहिल्यावस्ती कर्जत रोड वर पुन्हा ट्रॅक्टरला धडकून दोन जण जखमी त्यातील दोघांचे पाय फ्रॅक्चर आहेत

घटनेची माहिती अशी अहिल्यानगर वस्ती कर्जत रोड येथून भाऊसाहेब पद्माकर लबडे वय ४५ पिंपरखेड तालुका जामखेड जिल्हा आहिल्यानगर आणि जालिंदर तुळशीराम सांगळे वय ४६ मुक्काम पोस्ट कवडगाव तालुका जामखेड मोटरसायकलवर येत असताना अंधारात ट्रॅक्टर ट्रॉली दिसली नाही त्याला धडकून हे दोघे जखमी झाले असून पाय मोडले आहेत. घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना जामखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांचा फोन आला कोठारी यांनी ताबडतोब आपले मित्र दीपक भोरे आणि ऋषिकेश शेळके यांना पाठवून ताबडतोब दवाखान्यात दाखल केले दोघांवर उपचार चालू आहेत सदर घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी जामखेड पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना दिली असून पुढील तपास चालू आहे

## ऑनेस्टी पब्लिक स्कूल, युनिट माजलगाव येथे ''फार्मर्स मार्केट''प्रदर्शन आणि विक्री

माजलगाव दि ४ (प्रतिनिधी)-ऑनेस्टी पब्लिक स्कूल, युनिट मध्ये शनिवारी ''फार्मर्स मार्केट'' प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून पत्रकार कमलेश जाब्रस उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या विद्यार्थ्यांनी शेतकरी बाजाराचे सुंदर प्रदर्शन आयोजित करून केली. विद्यार्थ्यांनी विविध भाज्या आणि फळांचे आकर्षक चित्रण केले, जे शेतकऱ्यांच्या मेहनतीचे प्रतीक आहे.कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, शाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी भाज्या आणि फळे खरेदी केली. या विक्रीद्वारे विद्यार्थ्यांना अर्थव्यवस्थेचे महत्व आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीचे मूल्य समजले.शाळेचे मुख्याध्यापक आमृता तौर यांनी सांगितले, आम्ही मुलांना शेतकरी आणि त्यांच्या कामाबद्दल जागरूक करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ''शेतकरी हा आपल्या समाजाचा आधारस्तंभ आहे. त्यांच्या मेहनतीचे महत्व समजून घेणे आणि त्यांना आदर देणे हे आपले कर्तव्य आहे.'' हे प्रदर्शन आणि विक्री त्यांच्या कला कौशल्यांना, सामाजिक जागरूकतेला आणि अर्थव्यवस्थेच्या ज्ञानाला प्रोत्साहित करते.शाळेच्या शिक्षकवृंद प्रभा हरकळ , सुशीला जोशी, श्रुती कुलकर्णी, अनुजा गिलानकर, मीरा चिन्चोळकर, मीना जावकर यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.



## ना.पंकजाताई मुंडे यांच्या पिशोर, घाटनांद्रा, चौका,आडगाव,बजाजनगरला जोरदार सभा

छत्रपती संभाजीनगर दि.३(प्रतिनिधी)- जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याची मोठी संधी मतदारांच्या हाती असून, ही संधी साधत भाजपच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा भाजपच्या स्टार प्रचारक पंकजाताई मुंडे यांनी संभाजीनगर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या प्रचार सभांमधून केले. जिल्हा परिषद ,पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ना. पंकजाताई मुंडे यांनी आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून आपल्या झंझावाती प्रचार दौऱ्याला सुरवात केली. त्यांच्या पिशोर (कन्नड), घाटनांद्रा (सिल्लोड), चौका व आडगाव (फुलंब्री) आणि बजाजनगर येथे जोरदार सभा झाल्या.या सभांमुळे जिल्हा परिषद निवडणूक उत्साहाचे आणि कमळमय वातावरण निर्माण झाले. जाहीर सभांना संबोधित करताना त्या म्हणाल्या की, ग्रामीण भागाचा विकास हा जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातूनच प्रभावीपणे साधता येतो. पुढील पाच वर्षांत रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी भाजप ठोस काम करेल. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 'कमळ' या चिन्हासमोरील बटण दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

# शाळेच्या विकासात योगदान देत कोळवाडीच्या तरुणांनीआदर्श निर्माण केला -आ.सुरेश धस

## लोकसहभागातील शालेय साहित्यांचे केले वाटप

शिरुर कासार(प्रतिनिधी) : जिल्हा परिषदेच्या शाळा या ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यामुळे शाळेच्या विकासासाठी गावकऱ्यांचे योगदान महत्वाचे आहे. कोळवाडी (ता. शिरुर कासार) येतील तरुणांनी एकत्र येऊन शाळेसाठी लोकसहभागातून साहित्य दिले हा आदर्श निर्माण केला आहे. इतर गावांनी हा आदर्श घेतला पाहिजे असे मत आमदार सुरेश(अण्णा) धस यांनी व्यक्त केले.

कोळवाडी (ता. शिरुर कासार) येथील तरुणांनी, माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन साधारण आडीच लाख रुपये किमतीचे संगणक टीव्ही, खेळाचे साहित शाळेला भेट दिले. त्याचे लोकार्पन सुरेशअण्णा धस यांच्या हस्ते झाले. भाजपचे तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले,



शिरुर कासारचे नगराध्यक्ष रोहिदास पाटील, पंचायत समितचे माजी नगराध्यक्ष बाबुराव केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पवार व माऊली आप्पा जरांगे, ज्येष्ठ नेते सुरेश थोरात, नगरपंचायतीचे गटनेते गणेश भांडेकर, पत्रकार सूर्यकांत नेटके, उपसरपंच नारायण मानकर, देविदास नेटके, संदीपान नेटके, युवक नेते सुधाकर नेटके, साईनाथ नेटके, ग्रामसेवक अशोक खाकाळ, साहित्यिक विठ्ठल जाधव, सोनाजी मानकर, दत्ता पाटील सावंत, अप्पा पवने, शालेय समितीचे अध्यक्ष बाबासाहेब नेटके, आजीनाथ सावंत, महादेव सावंत, चंद्रकांत नेटके, युवराज नेटके, मिठु नेटके, प्रविण चव्हाण, ज्योतीराम नेटके, शहादेव घोडके यांच्यासह गावकरी व परिसरातील विविध गावचे सरपंच उपस्थित होते. आमदार सुरेश धस म्हणाले की, गावांतील सार्वजनिक कामांत युवक, माजी विद्यार्थी आणि तरुणांचा सहभाग वाढत असल्याची बाब चांगली आहे. अनेक ठिकाणी नको त्या गोष्टीला प्राधान्य दिले जाते. येथील नागरिक, तरुण व माजी विद्यार्थी यांनी सुमारे आडीच लाखाचे साहित्य शाळेला भेट दिले ही बाब आनंददायी आणि प्रेरणा देणारी आहे. हाच आदर्श आन्य गावांनी घेतला पाहिजे. येथील शाळेच्या खोल्या मोडकळीस आल्या असल्याने दोन शाळा खोल्या मंजुर झालेल्या असून त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार धस यांच्या हस्ते झाला. शाळेला साहित्य भेट देण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल संदीपान नेटके यांचा सुरेश घस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# स्वामी विवेकानंद विद्या मंदिर मा.वि. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



केज दि (प्रतिनिधी)- स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या उत्साही वातावरणात पार पडले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून नगराध्यक्ष सौ. सिताताई बनसोड या उपस्थित होत्या. तर इतर प्रमुख उपस्थितीमध्ये अंकुशराव इंगळे, जी.बी.गदळे, नारायणराव अंधारे, शैलाताई इंगळे मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, मु.अ. वसंत शितोळे, गणेश कोकीळ ,शंकर भैरट प्राचार्य, संघपाल मस्के मु.अ. आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उद्घाटक गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी बोलताना सुनील केंद्रे म्हणाले की, स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळतो अध्यक्षीय समारोप नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांनी केला यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी शेतकरी, लोकगीत, राजस्थानी घूमर लोकगीत, काश्मिरी लोकनृत्य, मराठमोळी लावणी नृत्य, सादर केली. पोतराज लोकनृत्य प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरलेकार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे, सहाय्यक कल्याण आदमाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# १२वी सायन्स विद्यार्थ्यांना बी.एस्सी. ॲग्री आणि बी.टेक. (फूड टेक.) प्रवेशासाठी एमएचटी - सीईटी परिक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दि.१२ फेब्रुवारी २०२६

बीड दि.४ (प्रतिनिधी):- राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या प्रवेश परीक्षांच्या नोंदणीला सुरुवात केली आहे. राष्ट्रीय स्तरावर जेईईच्या (मेन) दोन प्रवेश परीक्षा होतात, त्यामुळे विद्यार्थ्यांना दोन संधी उपलब्ध होते. तशाच दोन संधी महाराष्ट्रातील मुलांनाही मिळाव्यात, म्हणून या वर्षापासून सीईटी कक्षाने एमएचटी सीईटी बी. एस्सी. ॲग्री आणि बी.टेक. (फूडटेक.) या अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा दोन वेळेस घेण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांला एक प्रवेश परीक्षा देणे बंधनकारक असून, दुसरी प्रवेश परीक्षा ऐच्छिक असेल.नंतर त्याला ही संधी असणार नाही विद्यार्थ्यांने दोन प्रवेश परीक्षा दिल्यास त्याल दोन्हीपैकी ज्यामध्ये जास्त गुण असतील ते प्रवेशासाठी गृहीत धरले जातील, असे सीईटी सेलने जाहीर केले आहे.

परीक्षेच्या संभाव्य तारखाः एमएचटी सीईटी (पीसीएम व पीसीबी समूह) प्रथम प्रवेश परीक्षा ११ एप्रिल ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान होणार आहे. द्वितीय प्रवेश परीक्षा १०मे ते १७ मे २०२६ दरम्यान होणार आहे.

या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज, नोंदण वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावन उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही परीक्ष राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संगणकाधारित पद्धतीने ऑनलाइन घेतल्या जातील, असेही सीईट सेलने सांगितले आहे

सन २०२५-२६ प्रवेश प्रक्रिये दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, असंख्य विद्यार्थी हे बी.टेक (फूड टेक्नॉलॉजी), बी.एस्सी. ऑनर्स. (ॲग्री) बी. टेक (कृषि अभियांत्रिकी), बी.टेक. (जैवतंत्रज्ञान), बी.एस्सी. (उद्यानविद्या), बी.एस्सी. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन), बी.एस्सी. (समुदाय विज्ञान), बी.एस्सी. (मत्स विज्ञान), बी.एस्सी. (वनशास्त्र) या पदवीस प्रवेश घेण्यासाठी इच्छूक असतात, परंतू राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (एमएचटी-सीईटी) ही दिलेली नसल्यामुळे त्यांना या पदवी प्रवेशास पात्र राहता आले नाही आणि त्यांचे एक वर्षाचे शैक्षणीक नुकसान झाले आहे.

राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (एमएचटी-सीईटी) राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्षाकडून राबविण्यात येत असून संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज नोंदणी, अर्ज निश्चितकरणे व परिक्षा शुल्क भरण्याचे वेळापत्रक www.mahacet.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. यानुसार राज्य सामाईक प्रवेश परिक्षेची ऑनलाईन अर्ज नोदणी व अर्ज निश्चित करणे दि. १० जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरून घ्यावेत. या सामाईक प्रवेश परिक्षेविषयी (एमएचटी-सीईटी) अधिक माहितीसाठी सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे संपर्क करावा.

संपर्क :
९४२००२५०५२,
९७६३४३४५०४, ९९७०८४२०१४,
७५८८०८२०३४, ९९४१००१२१२.

# सावरकर महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाची कार्यशाळा



बीड दि ४(प्रतिनिधी) : येथील स्वा.सावरकर महाविद्यालयामध्ये आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या कार्यशाळेचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मिलिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलियास हे होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग प्रमुख डॉ.देविदास नागरगोजे, यांची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. इलियास म्हणाले की समाजामध्ये आदर्श प्रस्थापित करण्याची जबाबदारी युवकांची आहे.चांगल्या सवयी, चांगल्या कामाची सुरुवात स्वतःपासून केली तर समाज बदलेल. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी सांगितले की आजचा युवक हा आजचाच सुजाण नागरिक आहे. समाजामध्ये बदल घडवण्याची क्षमता युवाशक्तीत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अशोक डोके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दत्ता पवार यांनी केले तर आभार डॉ. देविदास नागरगोजे यांनी मानले.

# प्रा.डॉ.शाहीन सय्यद यांना नारीरत्न पुरस्कार



चौसाळा दि ४ (प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथील गृहशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. शाहीन सय्यद यांना व्यंकटेश बहुउद्देशीय सेवा भावी संस्था पुणे यांच्या तर्फे राज्यस्तरीय आदर्श नारीरत्न पुरस्कार नुकताच देण्यात आला. त्यानिमित्त महाविध्यालयात प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांच्या शुभ हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. खाकरे म्हणाले की,या पुरस्कारामुळे महाविध्यालायाचा नावलौकिक निश्चितच वाढेल . या वेळी पदव्युत्तर संचालक प्रा. डॉ. सुधाकर वनवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कालिकादेवी महाविद्यालय शिरूर येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल कु. सीता क्षीरसागर, कु. मोहिनी गवळी व संघप्रमुख प्रा. सुधीर माने यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्रा. डॉ. शाहीन सय्यद यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी रणजीत चाचा लोमटे यांची निवड

अंबाजोगाई दि ४ (प्रतिनिधी)- येथील शिवजन्मोत्सव समितीची बैठक शासकीय विश्रामगृह येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली या बैठकीत शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी रणजीत चाचा लोमटे यांची एकमताने निवड करण्यात आली .

सदर बैठक सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. २०२६ मध्ये साजरे होणाऱ्या सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती बैठकीचे अध्यक्षस्थानी दराडे सर हे होते तर अध्यक्षपदी सूचक व अनुमोदक म्हणून महेंद्र निकाळजे यांनी रणजीत चाचा लोमटे यांचे नाव सुचवले या सूचनेनुसार सर्वानुमते रणजित चाचा लोमटे यांची एकमताने शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची इस्रो दौऱ्यासाठी निवड



केज दि ४ (प्रतिनिधी) - येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या कु. कांबळे ज्ञानेश्वरी धनंजय व चि. गणेशकर शिवराज लक्ष्मण या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय निवड परिक्षेत घवघवीत यश संपादन केले तसे त्यांची इस्त्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) च्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. या अभ्यास दौऱ्यासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत संपूर्ण राज्यातून १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

यात साने गुरुजी निवासी विद्यालय केजचे दोन विद्यार्थी आहे. इस्त्रोच्या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांना उपग्रह तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, रॉकेट प्रक्षेपण प्रक्रिया तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड सर, उपाध्यक्ष राजेश कापसे सर, संकुलाच्या प्राचार्या डॉ. कविता गित्ते-कराड मॅडम व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.एम.ए.शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ६५/२०२६ सार्थक व इतर विरुध्द निरंक मार्फत : ॲड.ए.एस.सय्यद

**अर्जदार :** १) सार्थक पि. मोहन बांगर, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान, २) आकांक्षा पि. मोहन बांगर, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान, ३) राधिका भ्र. मोहन बांगर, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, ४) आशाबाई ध. बाबासाहेव बांगर, वय ६२ वर्षे, चंदा घरकाम,

अर्जदार क्र. १ व २ ची अ.पा. क. आई अर्जदार नं. ३, अर्जदार क्र. १ ते ४ रा. भायाळा ता. पाटोदा, जि. बीड.

विरूध्द निरंक

**मागणी अर्ज:** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरिल अर्जदार क्र. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत **मोहन पि. बाबासाहेब बांगर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मोहन पि. बाबासाहेब बांगर** यांचा मृत्यु दिनांक १२/०७/२०२५ रोजी मौजे भायाळा ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ व २ ही मयताची अज्ञान अनुकमे मुलगा व मुलगी असून अर्जदार क. ३ ही मयताचे पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र.०४ ही मयताची आई आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मोहन पि. बाबासाहेब बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची **पुढील तारीख दि. १६ मार्च २०२६.** आदेशावरुन

सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.लिपीक क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

दै.पार्श्वभूमी,बीड Date-05/02/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - SHAIKH MOEES SHAIKH HAMID**

**New Name : MOEES HAMID SHAIKH**

Address - At Khanapur Post Majalgav Tq.Majalgav Dist Beed Maharashtra 431131

दै.पार्श्वभूमी,बीड Date-05/02/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - RAHAT BEGUM ILYAS ATTAR**

**New Name : RAHAT MOEES SHAIKH**

Address-At Khanapur Post.Majalgaon Tq.Majalgaon Dist.Beed Maharashtra 431131

# दोन महिण्यांपासुन थकित उसबिले तात्काळ अदा करावीत; तालुक्यातील शेतकरी ऊस बिलाविना त्रस्त

माजलगाव दि. ४(प्रतिनिधी) मतदारसंघातील साखर कारखानदारांनी मागील दोन महिण्यांपासुन उसाचे बिले थकविले असुन ती तात्काळ अदा करावीत. अशी मागणी युवा शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अजयसिंह राउत यांनी केली आहे.

प्रसिध्दिस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मतदारसंघातील सर्वच साखर कारखाने, गुळ युनिटांनी गाळप केलेल्या उसाचे नोव्हेंबर, डिसेंबर महिना अखेर तर कुणी नोव्हेंबर महिणा अखेरपर्यंतच उसबिल दिले आहे. त्यावर अद्याप महिण, दिड महिणा तर काही कारखान्यांनी दोन महिणे उलटले तरीही उसबिल शेतक-यांना अदा केले नाही. परिणामी शेतक-यांची आर्थिक पिळवुणक होत असुन शेतक-यांना रब्बी हंगामातील पिकांकरीता लागणारे खते, औषधे खरेदीसाठी मात्र आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे जय महेश साखर कारखाना, लोकनेते सुंदरराव सोळंके सह. साखर कारखाना, छत्रपती सह. साखर कारखाना व तालुक्यातील तीनही गुळ युनिट कारखान्यांनी थकीत बिले तात्काळ उस उत्पादक शेतक-यांच्या खाती जमा करावेत असा इशारा युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने अध्यक्ष अजयसिहं राउत व उस उत्पादक शेतक-यांच्या वतीने देण्यात आला आहे.


SBI The banker to every Indian

प्राधिकृत अधिकारी यांचा तपशिल
नाव : श्री.रिझवान अन्सारी
शाखेचा ई-मेल : sbi.12953@sbi.co.in
मोबाईल क्र. : 8369645337, 9975449599 फोन नं. 0240 - 2480664

भारतीय स्टेट बँक,
तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा
प्लॉट नं.१, सिडको टाऊन सेंटर, सिडको,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००३

**अचल/चल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-ऑक्शन विक्री सूचना**

परिशिष्ट IV-A व II-A (नियम ८(६) व ६(२) मधील तरतुद पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) व ६(२) सह वाचले जाणारे दि सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, तहत अचल/चल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-ऑक्शन विक्री सूचना.

तमाम जनतेस आणि विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना याद्वारे सुचीत करण्यात येते की, धनको बँकेकडे संरक्षीत तारण/बोजा असलेली खालील नमुद अचल/चल मालमत्ता ज्याचा सांकेतिक ताबा **भारतीय स्टेट बँक** यांचे अधिकृत अधिकारी यांनी घेतलेला आहे, सदरील मालमत्ता **दिनांक १२/०३/२०२६** रोजी **''जशी आहे तशी''**, **''जी काय आहे ती''**, आणि **''जी काय तेथे आहे ती''**, **''विना आधार''**, या तत्वावर **भारतीय स्टेट बँक, तणावग्रस्त अस्ति वसुली शाखा, छत्रपती संभाजीनगर** यांना खालील संरक्षीत ऋणको यांचेकडून येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी **विक्रीस काढलेली** आहे. **कर्जदार, जामीनदार व मालमत्ता याचा सविस्तर तपशिल आणि ई-ऑक्शन साठीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे....**

| अ. क्र. | कर्जदाराचे नांव आणि जामीनदाराचे नांव | थकीत रक्कम ज्याच्या वसुलीसाठी मालमत्ता विकली जाणार आहे | मालमत्तेचा सविस्तर वर्णन | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.जयदिप काळे, प्रोप्रा.मे.श्रीलक्ष्मी पेट्रलियम सर्व्हिसेस ६४२,मातोरी, शिरूर कासार, बीड, महाराष्ट्र-४१३२४९ | रू. २६,८४,९८६.०० (दि.०४/०२/२०२६ पर्यंत + पुढील व्याज, दंड आणि खर्चासहीत) | गट क्र.२९६, घर क्र.६४२, मातोरी, तालुका शिरूर, जि.बीड, क्षेत्रफळ ०० हेक्टर ३० आर, ज्याची चतु:सिमा. पुर्वेस : दिगंबर जानू जरांगे, पश्चिमेस : भारत जानू जरांगे, दक्षिणेस : दिगंबर जानू जरांगे, उत्तरेस : सरकारी रस्ता | राखीव किंमत रू. ८०,४३,०००/- (ज्याखाली मालमत्ता विकली जाणार नाही) राखीव किंमतीच्या १०%, अनामत रक्कम (EMD) रू. ८,०४,३००/- बोली वाढ रक्कम रू. ५०,०००/- पटीत Property ID: SBIN0012953026 |

टिप :- कुठेही संबंधीत असलेले सर्व वैधानिक/खाजगी देयता, कर, मुल्यांकन, शुल्क इत्यादी भरण्याची संपुर्ण जबाबदारी ही यशस्वी खरेदीदाराची राहील.

इच्छुक बोलीदारांनी बोली-पूर्व अनामत रक्कम ई-ऑक्शन संपण्यापूर्वी ebkray (PSB Alliance) कडे भरणा करावे. बोलीदारास बोली-पूर्व अनामत रक्कमेचे क्रेडीट हे ebkray (PSB Alliance) च्या बँक खात्यात पैसे जमा झाल्यावरच मिळेल आणि सदरील बाबतीचे अपडेशन हे ई-ऑक्शन वेबसाईट वर राहील. या साठी बँकेच्या प्रक्रियेनुसार थोडा वेळ लागेल, त्याकरिता बोलीदारांनी सुचित करण्यात येते की, बोलीदारांनी त्याच्या स्वत:च्या फायद्यासाठी व शेवटच्या क्षणाची घाई व संकट टाळण्यासाठी बोली-पूर्व अनामत रक्कम थोडी आगाऊ वेळेत भरावी.

**ई-ऑक्शन ची तारीख व वेळ : दिनांक १२/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० पर्यंत प्रत्येकी १० मिनीटांचे वेळ विस्तारासह.**

मालमत्तेची पाहणी करण्याची दिनांक ०९/०३/२०२६ रोजी सकाळी १२.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत

ई-ऑक्शन सेवा पुरवठादार मे. PSB Alliance Private Limited यांचे वेबसाईट पोर्टल https://baanknet.com या वरून लिलाव करण्यात येईल. (हेल्पडेस्क नं. 918291220220)

अधिक माहितीसाठी मोबाईल क्र. 8369645337, 9975449599 | ई-मेल : sbi.12953@sbi.co.in यावर संपर्क करावा.

लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्ती https://bank.sbi/web/sbi-in-the-news/auction-notices/bank-e-auctions या वेबसाईटच्या लिंक वर उपलब्ध आहेत.

सही/- प्राधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक
तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा, छत्रपती संभाजीनगर

दिनांक : ०४-०२-२०२६
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

SHREE



**जय महेश मल्टि स्टेट वेहिकल सर्व्हिसेस को - ऑप सो. ली. व सद्गुरुकृपा ऑटोमोबाइल्स, ऑथोराइज्ड फ्रँचाइसी - श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी ली.**

**जाहीर वाहन लिलाव**

दि ०६-०२-२०२६ रोजी थकीत कर्ज वसुली करिता जप्त केलेले वाहन लिलावा मध्ये विक्री साठी काढले आहे तरीही त्यांची यादी खालील प्रमाणे आहे सदरील वाहन धारकाला काहीही तक्रार असल्यास जाहिरात दिल्या पासून दोन दिवसाच्या आत ऑफिसला येऊन भेटणे व थकीत कर्ज भरून आपले जप्त वाहन सोडवून घेणे अन्यथा आपले वाहन लिलाव मध्ये विक्री झाल्यास होणाऱ्या नुकसान भरपाई पूर्णतः वाहन धारक जबाबदार राहिल व वाहन खरेदी साठी ग्राहक स्वतः दिलेल्या पत्त्यावर वाहनांची तपासणी करून खरेदी करू शकतो.

| Sr. No. | Vehicle No. | Customer Name | Make | Model |
|---|---|---|---|---|
| 1 | MH12QW2864 | GAJANAN WAMAN KUTAPHALE | ERTIGA TOUR M | 2018 |
| 2 | MH03DV5276 | SUNIL SAHEB MANE | ERTIGA TOUR M | 2022 |
| 3 | MH17AZ7435 | RAMESHWAR VAMANRAO SHIND | RENAULT KWID RX | 2016 |
| 4 | MH17AE2771 | KISHOR PANDURANG SALVE | SCORPIO M2DI | 2010 |
| 5 | MH06BP0360 | RAHEMAN AYUB SHAIKH | SCORPIO S2 | 2016 |
| 6 | MH05AX1317 | ROHINI ANANTRAO DHUMAL | SWIFT DZIRE VDI | 2011 |
| 7 | MH22U2285 | GANGADHAR ASHOK PAITHANE | CRUISER CLASSIC | 2012 |
| 8 | MH14HU2776 | DNYANESHWAR PANDURANG DO | HYUNDAI XCENT | 2019 |

## कौसल्याबाई कालिया यांचे निधन



माजलगाव दि.४प्रतिनिधी: शहरातील जुना मोंढा भागातील रहिवाशी असलेल्या कौसल्याबाई राधाकिसन कालिया वय ७७ वर्षे यांचे वृध्दापकाळाने दि.४ फेब्रुवारी बुधवार रोजी दुपारी निधन झाले.त्यांच्या पार्थीव देहावर सायंकाळी राजस्थानी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. शहरातील व्यापारी कृष्णा कालिया यांच्या मातोश्री होत. कालिया परिवाराच्या दु:खात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## हाजी मोहम्मद साहाब यांचे निधन



नेकनूर दि ४ (प्रतिनिधी):-येथील माजी उपसरपंच तसेच सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिमत्त्व हाजी मोहम्मद साहाब यांचे मंगळवारी रात्री दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने नेकनूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सय्यद शहा इब्राहिम रह. दर्गा मस्जिद येथे त्यांची नमाज-ए-जनाजा अदा करण्यात आली.यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील जिल्हा भरातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान २ वर

### मराठवाड्याच्या रणांगणात आ.सुरेश धसांचा बुलंद आवाज

# छत्रपती संभाजीनगर-धाराशिवमध्ये प्रचार सभांनी गाजवले मैदान

पाटोदा दि.४(महेश बेदरे):- स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील प्रचार रणांगणात आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे भाजप आमदार सुरेश धस हे ठळकपणे केंद्रस्थानी आले आहेत. छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी आमदार धस यांनी घेतलेल्या सभांनी संपूर्ण वातावरण तापले असून, प्रचाराला नवा वेग मिळाला आहे.



धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात शेळगाव जिल्हा परिषद गटाचे उमेदवार शरद रामदास पवार तसेच चिंचपूर पंचायत समिती गणाचे उमेदवार एकनाथ पंढरीनाथ वायसे यांच्या प्रचार सभेत आमदार धस यांनी मतदारांशी थेट संवाद साधला. ग्रामीण विकास, केंद्र व राज्य शासनाच्या योजना आणि तळागाळातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर त्यांनी ठाम भूमिका मांडली. याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चिंचोली-नाचनवेल गटातील प्रचार सभेत जिल्हा परिषद उमेदवार भरतसिंग राजपूत, पंचायत समिती उमेदवार गीतांजली त्र्यंबक पवार व मंदाबाई राजू जंगले यांच्या प्रचारासाठी आमदार धस यांनी प्रभावी संबोधन केले. विकास, पारदर्शकता आणि लोकहित हाच भाजपचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राजकीय जाणकारांच्या मते, आमदार सुरेश धस यांचा प्रदीर्घ अनुभव, आक्रमक शैली आणि मतदारांशी असलेला थेट संपर्क यामुळे मराठवाड्यातील भाजपचा प्रचार अधिक प्रभावी ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेले विश्वासाचे संबंध आणि संघटनात्मक समन्वय या प्रचाराला अधिक बळ देत आहेत. दरम्यान, मराठवाड्यात सुरू असलेल्या या प्रचाराच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचाराची जबाबदारीही आमदार सुरेश धस यांच्याकडे येण्याची शक्यता राजकीय

पान २ वर

# श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

बीड- शहरातील नामांकित असलेल्या बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन या ठिकाणी सालाबाद प्रमाणे याही वर्षी अतिशय थाटा माटा मध्ये आणि मोठ्या धुमधडाक्यात महाराष्ट्र ातील नामांकित कीर्तन काराच्या कीर्तनाने या ठिकाणी सप्ताह सुरुवात होणार आहे तरी पंचक्रोशीतील सर्व बीड जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांनी येथे होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील व सर्व विश्वस्त यांनी केले आहे या सप्ताह मध्ये होणाऱ्या सर्व कीर्तनकाराचे कीर्तन खालील प्रमाणे आहे



वर्ष २३ वे अखंड हरिनाम सप्ताह दि.१६/०२/२०१८ ह.भ.प.माधव महाराज डाके (काठोडेकर) यांचे शुभहस्ते कलश स्थापना आणि सर्व भाविक भक्तांच्या सहकार्याने सुरू होत आहे.सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ५ काकडा भजन, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, २ ते ४ भावार्थ रामायण, ४ ते ६ प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ, किर्तन ८ ते १० व भजन ११ वा. जागर सोममवार दि.०९/०२/२०२६, ह.भ.प. विनायक महाराज गव्हाणे, ह.भ.प. पांडूरंग महाराज रांजवण, मंगळवार ह.भ.प. मच्छिंद्र महाराज पवार बीड, ह.भ.प. दिपक महाराज मेटे केज, होजाळ परिवार बीड,बुधवार दि.११/०३/२०२६ ह.भ.प. रमेश महाराज वायभट, ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे, गुरुवार दि.१२/०२/२०२६ ह.भ.प. अंगद महाराज मोरे, ह.भ.प. नाना महाराज कदम, किसन राऊत, बीड, दि.१३/०२/२०२५ ह.भ.प. अरूण नाना डाके, महंत स्वामी महेश्वरानंद गिरी, शनिवार ह.भ.प. भालेकर महाराज, ह.भ.प. रामेश्वर महाराज थोरबोले, जिवनराम पाटील, बाबुराव राऊत, रविवार ह.भ.प.सौ. सुमतीताई जगदीश पिंगळे, ह.भ.प. रंधवे बापु महाराज, सोमवार दि. १६/०२/२०२६ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मंडारीकर यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.

विनित : नवनाथ आण्णा शिराळे (पाटील) (अध्यक्ष) चे. ९८२२८७५९४५, पांडुरंग जानवळे चे.९७६७७८८४४८, श्रीमती राजची प्रदिप बाव्रस श्री. सदाशिव शेजाळ, बाबासाहेब शिदे, प्रधान पवार,

पान २ वर

# डॉ.राजेंद्र ढाकणे,डॉ.विनिता ढाकणे यांना चंपावती भूषण पुरस्कार प्रदान

बीड दि.४(प्रतिनिधी):-वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल बीड येथील प्रतिथयश स्त्रीरोग तज्ञ डॉ. राजेंद्र ढाकणे व डॉ.विनिता ढाकणे यांना अनिलदादा जगताप फोंडेशनच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा चंपावती भूषण पुरस्कार जाहीर झाला. बुधवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येवून त्यांना मोठ्या उत्साहात पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. ढाकणे दाम्पत्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

बीड जिल्ह्यात वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात मागील तीन दशका पासून कार्यरत असलेल्या डॉ. राजेंद्र ढाकणे व डॉ. सौ. विनिता ढाकणे या उभयत्यांनी लोकहितकारी, प्रेरणादायी कार्य केले आहे. वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य सर्वश्रुत आहे. तसेच सावित्रीबाई फुले महिला शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून गुरुकुल शिक्षण समूहाद्वारे हजारो उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना देशाचा उत्तम नागरिक बनवले आहे. तर इंग्रजी माध्यमातून शिक्षण देवून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पिढी घडवण्याचे कार्य डॉ. ढाकणे दाम्पत्याने मागील पंचवीस वर्षात केले आहे. आज या संस्थेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर तसेच



शासकीय सेवेत

पान २ वर

# उमरीत शिवजन्मोत्सव निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन

माजलगाव दि.४(प्रतिनिधी )तालुक्यातील उमरी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह, भव्य बैलगाडा शर्यत, तसेच पालखी सोहळा अशा विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. अखंड हरिनाम सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. गावातील उमरेश्वर मंदिर परिसरात कीर्तन, भजन, यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांचा अखंड हरिनाम सप्ताह आयोजनही करण्यात येणार आहे.

तसेच ग्रामीण भागातील आकर्षण असलेली भव्य बैलगाडा शर्यत हा या उत्सवाचा मुख्य

पान २ वर

## श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन



बीड -श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करताना जयंती महोत्सवाचे संस्थापक तथा प्रणेते अॅड.संदीप बेदरे, राहुल महामुनी, सुरज डहाळे आदी दिसत आहेत.

# सामान्याचें आशीर्वाद आणि शाप हे शक्तिशाली-ह.भ.प.विशाल महाराज

बीड दि.४(प्रतिनिधी):-चंद्राला शाप मिळाला होता, तीळ तीळ मारण्याचा, तेव्हा चंद्राने तपश्चर्या करून देवाचे आशीर्वाद मिळवले, देवाला देखील तो शाप दूर करता येत नव्हता, तेव्हा तीळ तीळ मारशील पण पुन्हा जन्म घेशील असा आशीर्वाद देत महादेवाने त्याला मस्तकी धारण केले. तेव्हापासून अमावस्येला चंद्र दिसत नाही तर पौर्णिमेला पूर्ण दिसतो पण नंतर चंद्रकोर रूपात असतो. शंकरा बरोबर चंद्रालाही नमस्कार होतो. आशीर्वाद आणि शाप हे शक्तिशाली असतातच. मरण यातनेपासून ईश्वराकडेच शरण जाता येते पण ईश्वराने मारले किंवा सोडले तर कोणीही वाचू शकत नाही.' श्रद्धा आणि विश्वास या एकाच नाण्याच्या दोन बाजू तसे शंकर आणि पार्वतीची ही शक्ती. सर्व काही



प्राप्त आहे पण श्रद्धा किंवा विश्वास नसेल तर सर्व कवडीमोल ठरते पण जवळ काहीच नसले आणि श्रद्धा विश्वासाने सर्व काही प्राप्त झाल्याचा आनंद मिळवता येऊ शकतो.

ईश्वर प्राप्तीसाठी सद्गुरु असावा लागतो. सद्गुरूप्राप्तीसाठी ईश्वर कृपाच व्हावी लागते. सद्गुरु चे स्थान महत्त्व आणि महात्म्य ईश्वरापेक्षाही सामान्यासाठी मोठं आहे. ईश्वराचा कोप, आवक कृपा होऊ शकते पण सद्गुरु, संत कोपले रागावले तरी त्यातून प्रगती किंवा लाभच होतो. माया -मातृशक्ती सर्व शक्तीमान असते. मायाच सर्वकाही घडवते, जसे आई मुलांना चॉकलेटही देते आणि पाठीत धपाटाही देते .मुलांना काय हवे ? किती द्यावे ? कधी द्यावे ? याचे भान आणि ज्ञान म्हणजेच

पान २ वर

# सौताड्यातील धस समर्थकांचा डिजिटल शाळेसाठी पुढाकार



पाटोदा दि.४(प्रतिनिधी):- आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या शिक्षणविषयक विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देत सौताडा येथील त्यांच्या समर्थकांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संपूर्णपणे डिजिटल करण्याचा निर्धार केला आहे. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी उपक्रम राबवण्याच्या आमदार सुरेश धस यांच्या भूमिकेतून प्रेरणा घेत, शाळेच्या सर्व वर्गखोल्या टप्प्याटप्प्याने डिजिटल करण्याचा हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांच्या निधनामुळे शोक वातावरणातही समाजासाठी काहीतरी सकारात्मक

पान २ वर

# ४ हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत साजरा झाला मदनलाल सारडा राजस्थानी विद्यालयाचे स्नेहसंमेलन

## स्व.अजितदादा पवार यांना श्रध्दांजली

## 'छावा' या नृत्याने जिंकले प्रेक्षकांचे मन

## महिला पालकांची गर्दी लक्षणीय ठरली








बीड दि.४(प्रतिनिधी):- येथील राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय पेठ बीड शाळेत दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमा चे आयोजन माँ वैष्णव पॅलेस बीड येथे जवळ पास ४००० लोकांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात पार पडला. या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद देण्यासाठी मोठा पालक वर्ग उपस्थित होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थानी सेवा समाज संस्थेचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संतोष सोहनी ( उपाध्यक्ष ,कॅट महाराष्ट्र राज्य), अंगद नवले (उद्योजक बीड), तसेच मंचावर राजस्थानी सेवा समाज संस्थेचे राजेंद्र मनोत उपाध्यक्ष, रामेश्वर कासट सचिव,किशोरकुमार बाहेती सहसचिव, गंगाभीषण करवा कोषाध्यक्ष तसेच अभय कोटेचा, जगदीश चरखा, अशोक मंत्री, केदार जाजू, राधेश्याम कासट, रामप्रसाद बियाणी, लाहोटी सर,मुख्याध्यापक गिरीश सोहनी मुख्याध्यापकमहेश पारीख,मुख्याध्यापक, हावळे सर उपमुख्याध्यापक, मालपाणी सर पर्यवेक्षक हे मान्यवर उपस्थित होते.

पान २ वर

# गेवराईत जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापनास तत्त्वत: मंजुरी




गेवराई दि.४(प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाची व आनंदाची बातमी समोर आली आहे. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथून प्राप्त अधिकृत पत्रानुसार गेवराई ता. गेवराई जि.बीड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास मा.उच्च न्यायालय यांच्या कडून तत्त्वत: मंजुरी देण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.आनंद एल. यावलकर यांनी वकील संघ गेवराई चे अध्यक्ष ड. अमित मुळे यांना पत्राद्वारे कळविले आहे. गेवराई तालुक्यात प्रलंबित असलेल्या सुमारे ११६८ प्रकरणांचा विचार करून हा प्रस्ताव मान्य करण्यात आला असून न्यायालयीन इमारत तसेच मा.न्यायाधीश व कर्मचाऱ्यांसाठी निवासी व्यवस्था उभारण्याच्या अधीन राहून नवीन न्यायालय स्थापन करण्यात येणार आहे.

पान २ वर

# दांडीबहाद्दर शिक्षकांमुळे भैरवनाथ वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

बीड दि ४ (प्रतिनिधी) -बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील गलथान कारभारामुळे ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. नुकतेच कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी निलंबित झाले असताना, दुसरीकडे काही शिक्षकांच्या बेफिकीर वर्तणुकीमुळे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

बीड तालुक्यातील जरुड केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंतर्गत भैरवनाथ वस्ती शाळेतील मुख्याध्यापक राजेश देशमुख हे गेल्या १२ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून, ते नियमितपणे शाळेत गैरहजर राहत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शिक्षक २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी केवळ झेंडावंदनासाठी शाळेत येतात, तर इतर वेळी शाळेकडे फिरकतही नाहीत.भैरवनाथ वस्ती शाळेत जवळपास १०० लोकसंख्या असून इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत वर्ग चालतात. मात्र, दुसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकाच्या गैरहजेरीमुळे पालकांना आपल्या मुलांना २ किलोमीटर अंतरावरील जरूड येथील जिल्हा परिषद शाळेत पाठवावे लागत आहे.महिन्यातून एखाद-दोनदा येऊन हजेरी मस्टरवर सही करून निघून जात असल्याचा आरोप पालक अमोल जाधव यांनी केला. दरम्यानया गंभीर प्रकाराबाबत सामाजिक

पान २ वर

# चौकात शिवरायांचा पुतळा उभारण्याचे लोकप्रतिनिधीचे आश्वासन हवेतच विरले

पाटोदा दि.४ (प्रतिनिधी)-लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा पाटोद्याच्या शिवाजी चौकात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारू असे शिवप्रेमी जनतेला जाहीरपणे. आश्वासन दिले मात्र शिवजयंती येऊन ठेपली तरीही अद्याप शिवाजी महाराज चौकात पुतळा उभारला न गेल्याने जनतेत विशेषता शिवप्रेमीत नाराजीचा सूर दिसून येत आहे

पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अद्यापही शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आलेला नसल्याने शिवप्रेमी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती लोकप्रतिनिकडे शिवप्रेमी नागरिकांनी



पान २ वर

# सांगळवाडीचा मुलगा झाला क्लासवन अधिकारी



बीड दि.४(प्रतिनिधी):- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत शिरूर कासार तालुक्यातील सांगळवाडी गावच्या भूमिपुत्राने दैदित्यमान यश संपादन केले आहे. प्रदीप विष्णू सांगळे यांची भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागात उपअभियंता गट-अ या वरिष्ठ पदावर निवड झाली आहे . या यशाबद्दल रायमोहा परिसरातून आणि संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे . जिद्द आणि मेहनत यांचे हे फळ आहे. प्रदीप सांगळे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागात झाले. ग्रामीण भागात राहत असताना त्यांनी अत्यंत जिद्दीने स्पर्धा परीक्षेत अभ्यास सुरू ठेवला. गट-अ सारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या पदावर त्यांची निवड झाल्याने

पान २ वर

CMYK